छत्रपती संभाजी महाराजांचे

“ दानपत्र ”

TG : MarathaArchives

छ. संभाजी महाराजांचे संस्कृत दानपत्र

संदर्भ :

भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक,

पुणे वर्ष ६१, अंक २-४, शक १९०४-५

(पृ. ६०-६९)

(शिव-चरित्र-साहित्य, खंड १४)

२९०
व. भा.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६१, अंक २–४, शक १९०४–५

(शिव-चरित्र-साहित्य, खंड १४)

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Year 61, No. 2-4, Oct. 1982-April 1983

(Records of the Shivaji Period, Vol. 14)

अनुक्रमणिका

निवेदन ५

शब्दसंक्षेप व संदर्भसंक्षेप ६

१. वाईकर देशपांडे (पत्र क्र. १ ते ११) ७

२. चिंचवडकर देव (पत्र क्र. १२ ते २५) २०

३. लक्ष्मेश्वर देसाई (पत्र क्र. २६ ते ३२) ३८

४. संकीर्ण पत्रे (पत्र क्र. ३३ ते ४४) ५३

पत्रांचा कालानुक्रम ७५

सूची ७६

मंडळ-वृत्त ८२

१. महाराष्ट्र इतिहास परिषद : १९८३ अधिवेशन ८२

२. श्री. य. न. केळकर-सत्कार-भाषण ८७

ग्रंथ-परीक्षण ९०

वाचकांचा पत्रव्यवहार ९२

———

TG : MarathaArchives

पत्रांची छायाचित्र

(कालक्रमानुसार)

पृष्ठ क्र.

१. पत्र क्र. ३३–पहिला इब्राहीम आदिलशाह यांचे द्वैभाषिक फर्मान (२१ डिसें. १५४०) ५४

२. पत्र क्र. १२–शहाजीचे पत्र (४ डिसें. १६२८) २२

३. पत्र क्र. १५–शिवाजीचे पत्र (३१ ऑगस्ट १६५५) २६

४. पत्र क्र. ३९–संभाजीचे दानपत्र (२७ ऑगस्ट १६८०) ६४

५. पत्र क्र. २२–राजारामाचे पत्र (१२ ऑगस्ट १६९४) ३२

६. पत्र क्र. ३१–लक्ष्मेश्वर देसाई केंचनगौडाचे पत्र (सप्टें.-ऑक्टो. १७०१) ४९

———

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५ कालयुक्त संव्छर माघ वद्ये नवमी शनिवार तुक परभु मजमदार ता आजगाऊ पा कुडाल यासि राजाज्ञा येसी जे तुझे निा पैके बाकी आहेत बाबत बाजी विश्वनाथ बाा देसकुलकरणी ताा कानदखोरे वजाई वाा खंड व बाजे किरकोल वजाई येकून पाा होनू ११८॥अकरा होनू तीन दुवल देखत कागद सदरहू पैके रसद हुजूर पाठऊन देणे उजूर असेल तरी हुजूर येणे या कामाबदल बाोा बवाजी विन + + +

वार　सुद　वार　　　　सुरू सुद वार

पौा छ ७ माहरम

■ ■ ■

— ३९ —

छत्रपती संभाजीमहाराजांचें दानपत्र

[प्रस्तुतचे संभाजीचे दानपत्र कै. म. म. द. वा पोतदार यानी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पंधराव्या वाढदिवसाच्या (शके १८४७) प्रसंगी वाचले. ते प्रकाशित करण्याच्या उद्देशाने इ. १९२८ मध्येच कच्चे छापून ठेवले होते. कै. पोतदारांना या दानपत्राविषयी काही लिहावयाचे होते. पण तसे करण्यापूर्वीच ते दिवंगत झाले. आता या अंकाच्या निमित्ताने प्रथमच ते दानपत्र संपूर्णपणे आवश्यक त्या टीपांसह प्रकाशित करीत आहोत.

मावजी व पारसनीस यांच्या ' सनदापत्रांतील माहिती ' या ग्रंथात काही संस्कृत दानपत्रे छापली आहेत,ती अभ्यासूंनी पाहण्यासारखी आहेत. त्यांत पृ. १ ते ६ वर आरंभीची दोन आणि पृ. २११ ते २१७ वर नंतरची चार अशी एकूण सहा दानपत्रे आहेत. या सहाही दानपत्रांच्या आरंभी ' नमस्तुंग ' हा श्लोक आहे. ती सर्व छत्रपति राजाराम यांच्या नावची आहेत. त्या सर्वांत वंशकथन आलेले आहे.

प्रस्तुतच्या दानपत्राचा उल्लेख डॉ. सौ. कमल गोखले यांच्या ' शिवपुत्र संभाजी' (पुणे, १९७१) या ग्रंथात पृ. ४३२-३४ वर आलेला आहे. राज्यपद मिळविण्यात आलेल्या अडचणी दूर होऊन ते मिळाल्यावर, तत्संबंधी पूर्वी संकल्प केल्याप्रमाणे संभाजीमहाराजांनी जे दान दिले ते या दानपत्रात ग्रथित आहे. यावर 'श्री. शंभोः शिवजातस्य ' ही राजमुद्रा आहे.

हे दानपत्र जामदग्न्यगोत्री, आश्वलायनसूत्री, ऋग्वेदांतर्गत शाकलशाखाध्यायी, कऱ्हाडे ब्राह्मण, परशुराम क्षेत्रातील कुडाळ येथील नगरोपाध्याय, वाकरे आडनावाचे, नामदेवभट्टाचे पुत्र, महाशय, सर्व मांत्रिकांत श्रेष्ठ, यांना संभाजीने दिलेलें आहे.

या दानपत्राचा मराठी गोषवारा सौ. गोखले यानी वर उल्लेखिलेल्या त्यांच्या पुस्तकात दिला आहे.

या दानपत्राच्या वाचनात डॉ. श्री. ल. आठलेकर यांचे साहाय्य झाले आहे.

हे दानपत्र एकूण ३०० सें. मी. लांब व २३.५ सें. मी. रुंद आहे. ५० सें. मी. लांबीचा एकेक कागद, असे सहा कागद असून, पाच ठिकाणी जोड असलेले असे हे दानपत्र आहे. दानपत्राचा कागद चिवट व उत्तम जातीचा आहे. त्यारील हस्ताक्षरही ठसठशीत, मोठे व वळणदार आहे. दानपत्रावर वाजूने वेलवुट्टी काढलेली असून, जागोजाग फुलांची चित्रे ठशांच्या रूपाने त्यावर उमटविलेली दिसतात.

या दानपत्रातील विशेष उल्लेखनीय नावे व वाक्यांश अधोरेखित केले आहेत. त्यातील काहींचे स्पष्टीकरण खाली देत आहोत :

१. 'शिखरस्वामिशंभुमहादेव'

भोसल्यांचे जुने कुलदैवत म्हणजे वेरूळचा घृष्णेश्वर. मालोजीचा फलटणच्य निंबाळकरांशी नात्याचा संबंध आल्यानंतर भोसल्यांचे कुलदैवत सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव हे बनले आणि मालोजीने यात्रेकरूंना कायमचे पाणी मिळावे म्हणून तेथे एक तलाव बांधला.

२. 'महावलीदुर्गग्रहण'

शहाजी निजामशाही वाचविण्याचा शेवटचा प्रयत्न करीत असता अगदी अखेरीस तो कोकणातील माहुली गडावर निजामाच्या वारसास घेऊन गेला. तेव्हा विजापूरकर व मुघल ह्यांनी त्या गडास वेढा घातला. त्या वेढ्यातून सुटणे व निजामशाही वाचविणे ही दोन्ही कामे अशक्य आहेत असे लक्षात आल्यावर विजापुरी सरदार रणदुल्लाखान आणि कान्होजी जेधे ह्यांच्या मध्यस्थीने शहाजीने विजापूरकर व मुघल ह्यांशी तह केला व त्यानुसार त्याला विजापूरच्या आदिलशाहीकडे जावे लागले, आणि तेथे त्याला आदिलशाहाने सन्मानपूर्वक सरदार म्हणून स्वीकारले.

३. 'हैंदवधर्मजीर्णोद्धारणकरणधृतमतिः'

येथे हे विशेषण शहाजीला लावले आहे हे लक्षणीय आहे. त्याने हैंदवधर्मजीर्णोद्धाराकरिता नेमके काय केले ते सांगता येत नाही. 'राधामाधवविलासचंपू' वरून, त्याच्या पदरी असलेल्या कवींना व विद्वानांना त्याने आश्रय दिला होता एवढे कळते. तसेच चिंचवडच्या देवस्थानासंबंधी त्याने पूज्यभाव दाखवून त्यास शक्य ते साहाय्य केले होते. शिवाय शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेव देवस्थानाची व्यवस्था नीट रहावी म्हणून त्या गांवची पाटिलकी आपल्या नावे त्याने करून घेतली होती. परंतु हे सर्व किरकोळ उल्लेख आहेत.

४. ‘ कनकगिरीप्रस्थान ’

शहाजीची पहिल्या व सर्वात मोठ्या कैदेतून सुटका झाल्यावर काही वर्षांनी तो व अफझलखान यांजकडे कनकगिरीचा नायक उडचप्प यास आदिलशाहीच्या आधिपत्याखाली आणण्याचे काम सोपविले होते. वस्तुतः शहाजी व अफझलखान ह्यांचे विळ्या-भोपळ्याएवढे सख्य होते. तरीही शहाजीवर वचक असावा म्हणून ही योजना होती. ह्या स्वारीत शहाजीचा थोरला मुलगा संभाजी हा मारला गेला. अफझलखानाच्या कपटामुळे तो मारला गेला असा प्रवाद होता.

५. ‘ अफझल्लकक्षस्थलोद्दालनविछूछालन ’

अफझलखानाच्या काखेत विचवा खुपसला त्या घटनेला उद्देशून हा उल्लेख केला आहे.

६. ‘ सुरत्राण मातुळ ’

सुलतान (सुरत्राण) किंवा मुघल बादशाह औरंगजेब याचा मामा (मातुळ) शायिस्तेखान येथे निर्दिष्ट आहे.

७. ‘ विजयपुराधीश्वरभागानगरेशादिछत्रपतिप्रार्थ्य .... शिवराजपुत्रेण ’

विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनी प्रार्थना केल्यामुळे, ज्याने पठाणादींनी जिंकलेला कर्नाटक प्रांत आपल्या ताब्यात आणला असा भूशवल म्हणजे भोसले कुलाला चंद्राप्रमाणे असणारा जो शिवाजी त्याचा मुलगा (संभाजी).

८. ‘ वैरिभावप्रविष्ट प्रधानादि—सापत्नरोषाक्रांत....

शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळी संभाजीला युवराज्याभिषेक झाल्यामुळे शिवाजीची तत्कालीन पट्टराणी सोयराबाई हिच्या मनांत दुष्ट मंत्र्यांच्या सल्ल्याने सवतीमत्सर उत्पन्न झाला असा तत्संबंधी येथे उल्लेख आला आहे.

९. ‘ दलेलासुर ’

म्हणजे दिलेरखान

१०. ‘ युग्मव्योमरसेंदु ’

युग्म = २, व्योम = ०, रस = ६, इंदु = १. यांची ‘ अंकानां वामतो गतिः ’ या नियमाप्रमाणे १६०२ अशी संख्या येते. शालिवाहन शक १६०२. त्या वर्षी दानपत्रात लिहिल्याप्रमाणे त्याशी जुळता रौद्र संवत्सर येतो.

नभस्य = भाद्रपद, सितदशमी = शुद्ध दशमी, इंदुवासर = सोमवार.

या दिवशी सूर्योदयाला नवमी होती. पण त्याच दिवशी पुढे दशमी लागली. म्हणून येथे दशमीचा उल्लेख ठीकच आहे. त्या दिवशी संभाजीच्या हाती मराठी राज्य

पक्केपणे आले. म्हणून त्याने ज्या सुलतानी वराहामध्ये (पादशाही होनामध्ये) २४ गुंजा (कृष्टल) शुद्ध सोने होते असे दहा हजार वराह (होन) देण्याचा संकल्प सोडला. ते महाशयस्वामीच्या पुत्रपौत्रांनी वर्षानुवर्षे भोगावे, असे दानपत्रात म्हटले आहे.

या दानपत्रावर राज्याभिषेक वर्ष ७ भाद्रपद शुद्ध त्रयोदशी शुक्रवार या दिवशी अमात्य रघुनाथ नारायण (हणमंते) ह्याने ' लेखनालंकार ' हा शेरा मारला व हे दानपत्र अधिकृतरीत्या पुरे झाले.

———

A Danapatra (Gift-deed) by Sambhaji, 1680

(In the work of P. V. Mawji and D. B. Parasnis entitled 'Sanads and Letters', a few *danapatras* have already appeared. They belong to the times of Chhatrapati Rajaram. These *danapatras*, almost as a rule, contain the genealogical descriptive accounts of the donor and the receiver.

The present gift-deed was made by Sambhaji after he finally attained the state power at the end of various difficulties and hurdles. The gift was made to a Brahman, Mahashaya of Kudal in Konkan at the time of pilgrimage to Shambhu Mahadeo of Shinganapur, the family-deity of the Bhosales.

The present *Danapatra* contains some interesting references : Shivaji's father, Shahaji, is described as one who resuscitated the Haindava Dharma, and Sambhaji's step-mother, Soyarabai, is described as being under the evil influence of Shivaji's wicked ministers, who were against Sambhaji's coming to the power.

——

पोतदार संग्रह श. १६०२ भाद्रपद शु. १३
रा. ७ भाद्रपद शु. १३ इ. १६८० ऑगस्ट २७
सु. १०८१ सावान ११

(१. पत्राच्या आरंभीच्या सहा ओळींनंतर मध्यभागी १६ बुरजी पिंपळपानी शिक्का : ' श्री । शंभोः शिव । जातस्यमुद्राद्यौ । रिव राजते ॥ यदं । क सेविनो लेखा । वर्तते कस्य नो । परि ')

॥ नमस्तुंगशिरश्चुंबिचंद्रचामरचारवे ॥
॥ त्रैलोक्यनगरारंभमूळस्तंभायशंभवे ॥
॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ॥
॥ द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ॥
॥ एकं नित्यं विमळमचळं सर्वदा साक्षिभू ॥
॥ तं भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥
॥ मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥
॥ छत्रपतेः यदत्रोपरिलेखितं ॥ छं ॥ श्री ॥ [१]

०॥र्द स्वतिश्रीमद्रत्नखचितमहार्हमाणिक्यमंडित हेममयमुख्य स्तंभोपशोभितसुवर्णरज्जुराजिरंजितहरिन्मणिहीरककांतिछटानीराजित हैरण्यराजततंतुविहित वस्त्रविस्तारविस्तृत मारकतपताकापंक्तिपरिष्कृत समारूढसुरव्यूहपुरोभागसंगीतशास्त्रानुसारिगंधर्वसिद्धकिन्नरसाध्याप्सरोगणकंठमाधुर्यभंगीसंगतसमारचितगानानुकूळीकृत मनोहरतरललितसत्तालजांबूनद विनिर्मित विविधजलयानजालालंकृतभूरिस्वर्णभारभासुरभूमीधरसमुदायभासमानसुधासिंधुमध्यवर्तित्रैलोक्यचक्रवर्तिकविकुळवाग्वैखरीवर्णनीयप्रधानवस्तु प्राधान्यांतरवर्तिप्रतिदिवसप्रोत्फुल्लवकुळकुरवकाकीर्णचंपकाशोककुटजकल्हार नागपुन्नागमल्लिकामालतीकेतकीजातिवेलैलावल्लिवल्लिततताळतमाळहिंताळनारीकेळक्रमुकदाडिमीजंबुनिंबुजंबीरबीजपूरापूरितपारिजातराजिराजित लवली लंघित माधवीमिळनमुग्धमुकुलितरसाळमंजुळमंजरीसमास्वादनंमत्तकोकिळकलकंठसमारब्धसंयोगिहृदयाह्लादकमुक्तिमानिनीमानध्वंसकनिर्वासित समस्तदुर्वासनाबीजहार्धरेखात्मकबीजजीवातुकावाङ्मनसगोचरनानापुष्पजातिपरिभ्रमणप्राप्तपरभागमधूकद्राक्षामंडपांतर्गतपुष्पंधयझंकारारावराविंत चंदनादिमाननिंदित नंदनोद्यानपाटित चैत्ररथप्रमाणभक्तजनप्राणशुकसारिकाशब्दसारसक्रेंकारकृतकांदिशीकमहामहापातकिसंघातसमाश्वासनपूर्वकसमाधानद्राणमहोद्यानमाळामनोज्ञसप्तद्वीपभावनाभाव्यमानान्यतमद्वीपदेदीप्यमानसमुद्रांतनिष्क्रांतरत्नानुविद्धानंतपरिखापरिक्रांत सुरव्यूहव्यापृत गोपुरप्रांतशांतीकृत संसारपरिभ्रमणश्रांतसमावेशित शांतदांतनिजांतर्गत भक्तजनभीषित कृतां-

TG : MarathaArchives

॥ मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥
॥ छत्रपतेः पदत्रोपरिलेखितं ॥ श्री ॥

०॥६ स्वस्तिश्रीमद्रत्नखचितमहार्हमाणिक्यमंडि
तदेममयमुख्यस्तंभोपशोभितसुवर्णनिर्मितराजिरंजित
द्रतिमणिहीरककांतिछटानीराजितहेमरत्नजततं
तुविहितवस्त्रविस्तारविस्तृतमानकतपताकापंक्ति
परिष्कृतसमारूढसुरवदृहपुत्रोरागसंगीतशास्त्रानु
सारिगंधर्वसिद्धकिन्नरसाध्याप्सरोगणकंठमाधुर्य
भंगीसंगतसमानचितगानानुकूलीकृतमनोहर
तरललितसत्तालजांबूनदविनिर्मितविविधज
लयानजालालंकृतभूरिस्वर्णजालजालसुरभूमी
धरसमुदायजलसमानसुधासिंधुमध्यवर्तित्रैलो
क्यचक्रवर्तिकाविकुळवागेश्वरीवर्णनीयप्रधा
नवस्तुप्राधान्यांतर्वर्तिप्रतिदिवसप्रोत्फुल्लबकुळ
कुरबकाकीर्णचंपकाशोककुटजकल्हारनाग
पुन्नागमल्लिकामालतीकेतकीजातिवेल्लीवल्लिव
ल्लितताकतमाकरिताळनाचीकेळक्रमुकदाडिमीजं
बुनिंबुजंबीरबीजपूरप्रफितपानजातनाजिनाजि
तलवलीलंघितमाधवीमिळनमुग्धमुकुलितर
साळमंजुळमंजरीसमास्वादनमत्तकोकिळकल
कंठसमानध्वसंयोगिहृदयाह्लादकमुक्तिमानिनीमा
नध्वंसकनिवासितसमेरुदुर्वासिनाबीजहाधरिला

पत्र क्र. २९ – संभाजीचे दानपत्र (२७ ऑगस्ट १६८०)

तानर्घ्यमौक्तिकमाळिकाजाळलंवितवितानसंतानशोभायमानमृदुत्तरास्तरणा-
नुषक्तदेवयानोचित वहुविधविमानवेदिकाविभ्राजमानवहळागरुगुग्गुळाद्यष्टांग-
धूपघमघमायमानकनकप्राकारहृदयानुकारसंसारसारसंपूर्णविवुधमंडलीमंडितां-
जळियोगानुध्ध्येयद्वाःस्थीकृतांगनाजनगौरवतर्जनीतर्जनमात्रविधेयीकृतविष्णुविरिं-
चिप्रमुखदेवाधिदेवसर्वदेवतासार्वभौमधामधामीभूत मंजुमणिमंदिरांतर्गतयवांकु-
रराजित व्रह्मादिपंचमंचकात्मकत्रिदशोपासित मकरंदसंदोहामोदितादभ्रा-
स्तरणोपधानहंसगुलिदलिमसमासक्तपर्यंकांचित कमनीयकामेश्वरांकस्थित
सस्मेरमुखाकृतिनिराकृतेषदुन्मिषितारक्तारविंदद्युतिनिसर्गकज्जळितलोचनला
वण्यविनिंदित नीळोत्पळरुचिररुचिविजितपरिपक्वदाडिमीवीजवर्णवैभव-
दंतोद्योतनिपतनसंप्राप्तपरभागारुणवसनकंचुकीरचनसमुद्गीर्णलौहित्यसंवळितां
गारुणिममहिमलोहितितमलोहितमणिमाळातिरोहित मुक्ताहीरकेंद्रनीळहारानु-
प्रकटित निजप्रवाहांतर्हितजान्हवीकलिंदजासलिलकल्लोलप्रत्यक्षप्रकाश्यमान
स्वरूपवत्सरस्वत्युपसेव्यमानकामयमानकामेशप्रारब्धमुखामृतदीधित्यमृतपान-
निपतित पीयूषविंदूयमाननासामौक्तिकसंभ्नाजमानवैभातिकसंध्यारागानुरंजि-
तजलदजालजालितारुणोदयकाळीनतरणिमंडलायमानारुणवसनाछादित पद्म-
रागमयशिरोमंडनमंडनायमानतारुण्यसमयोपचीयमानराजराजेश्वरतरुणिम-
तपःफळायमानानुपमानकुचकुड्मळोछ्रायनमन्मध्यलतिकाभंगभयभीरुविधि-
वलित्रिवलीवलनविद्योतमानशृंगारवीजांकुरकोरकायमानरोमराजिराजितरा-
जराजेश्वरीनिरंतरसन्निधिसुखजिघृक्षुहंसभूषावेषायमानसर्वांतर्यामिहंसपरमहं-
सोपास्यमानचरणकिंकिणिकारणत्कारव्याजचतुर्वेदोद्भासितवहुविधदेहव्या-
पारशब्दनिःशब्दप्रकारकलितनिजाधारानुवारध्यामानप्रतिपक्षक्षयिष्णुक्षया-
पाकरिष्णुदशविधव्यवस्थापितदिव्यदेहावस्थविधृतनखस्वरूपकुमुदसखवियो-
गासहिष्णुहरितलोहितपीतश्यामळवर्णाक्रांतरत्नजातोजृंभितांगुलीयकछळन-
क्षत्रसंहतिविस्मृतदेहभावानुभाव्यमानालक्तकरसमिषपतिप्रमपूराभिषेकपरिपूर्य-
माणनिजभावनानियमितनिर्द्वंद्वद्वंद्वतिरोभावलीलोल्लासित ललितद्वंद्वभावका-
मितफळप्रदानविधिविशेषिताहमहमिकापूर्वाभूतपूर्वपंचपल्लवांचितकल्पशाखि-
शाखप्रतिद्वंद्वांतर्भावललितचरणारविंदद्वंद्वनिदिध्यासाध्यासिततादात्म्यभावप्र-
तिदिवसप्रेमकौतूहळभरप्रारंभित पादुकापूजनसंप्राप्तैकहुंकारपातितनहुपप्रभु-
भावचुलकितमहोर्मिमाळासंफाळितसलिलप्रादुर्भावदर्शनमात्रहृदयानुशयशायि-
तातापिवातापिदुर्दावबंधितविंध्याद्रिनिर्वंधदुर्भावलोपामुद्रापतिप्रभावयोगज्ञान-
विज्ञानविज्ञात विश्वभावभसितोद्धूलनध्यानप्रवंधपठनरुद्राक्षधारणशिरःके-
शानुसारणानुवद्धार्धनारीनटेश्वराविर्भावविभूतिमात्रप्रदानदत्तपरमैश्वर्यप्रसिद्ध-
शुद्धसहजभावानुदिननिबद्धपद्मासनारब्धकामकळास्तोत्रपठनयापितषड्याम-
शंभुनृपप्रार्थनाविर्भूतभृकुटिवक्रिमचंक्रमणक्रमसंक्रमितनेत्रशोणिमोपशामित-

जगदंबापाशपाशिताकुशाकर्षणत्रासितकतिपय दुर्दांतमहाराष्ट्रोन्मिश्रनिरभ्राभ्रो
द्भासिविद्युद्विलवलनशालिलक्ष्मीमदांधप्रमादमंदिरोन्मत्तदुर्मंत्रिमंत्रितछत्रधारण-
सिंहासनाधिरोहणप्रत्यूहीभूताविर्भूतबहळतरकोळाहळकिलिकिलाकलिततराति-
क्रूरकठिनसंग्रामोद्योगसंभ्रमोद्भ्रांतभ्नांतग्रामसमुद्रवलयावलितपृथ्वीतलप्रथितप्र-
करणगुरुपरिचर्याचरणसंयातशुद्धांतःकरणशरणशरणैकशरणसकलजनरसना
भरणप्रबलपापक्षयकरणानुस्मरणतापत्रयहरणनित्यपूजनसंभारितनवावरणभा-
वभजनभंजितचैतन्यावरणदुर्दैवदावपीडितपापसंघातसंघटितप्रमोदनघनघनावर-
णनिरतध्याननिर्धौतजन्मजरामरणभवोदधिदुस्तरणोपायनिखिलनिगमस्मृति-
शास्त्रपुराणसंमतसंपादिततरितरणादरणमहाप्रलयकालाकलिताक्षरण.... योगिध-
न्यायमाननामधेयजामदग्न्यागोत्राळंकृतकऱ्हाटकदेशीयद्विजांतर्गतवाकरोपनाम-
ककुळालंकाररामक्षेत्रमंडळकुंडलायमानकुडालनगरोपाध्यायधौरेयद्विजाग्रग-
ण्यनामनामदेवभट्टात्मजाश्वलायनसूत्रोपबृंहितऋग्वेदांतर्गतशाकलशाखाध्या-
यिसकलमांत्रिकवर्यमहामहानुभावभावितयमनियमासनप्राणायामप्रत्याहार-
ध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठाकनिष्ठीकृतवसिष्ठादिशिष्टमहाशय-
स्वामिभ्यःशिखरस्वामिशंभुमहादेवयात्रासमागमसमागतसमस्तदिग्देशवास्त-
व्यजनसमारचितकर्णारुंतुदसलिलकोलाहल वर्णनानुकर्णनसंयातशिवभक्ति-
२
भावविकारमनःकल्पिततोयौत्रतरलिततकटाप्रकारसमुज्झितस्वायव्ययप्रायवि-
चारहरिश्चंद्ररंतिदेवानुसारसंकल्पितसंसर्वस्वागारमांधातृसदृशमहोदारप्रथमांत-
र्धनप्रदानकृतनिर्माणप्रारंभनिर्धार विहितैकोत्तरशतसंख्याककुलप्रतिष्ठापूर्वक-
पूर्वपूर्वजसमुध्धारपरीक्षानिमित्तकैलासवासिपरित्याजितपूर्वसेवनोद्योगभवव्या-
पारभावभजितभवनिजामद्वारपरिगृहीतसंपूर्णसांसारिकसमाचारदृढतरसरोवंधन-
छन्नस्वछंदप्राक्कर्मानुबंधनिनवंधसमसम्यगाबद्धवेदशास्त्रपुराणस्मृत्यागमानुमि-
तिसिद्धांतसिद्धांतितभाविपृथ्वीचक्रशक्रायमानांकुरितशाश्वतवैभवसंभरितहे-
षाहषिततोयदगर्जनागर्जितसंतर्जितदारिद्र्यप्रचारहयहस्त्यादिसंभारसिंहावलो-
कानुकारविरचितचित्तविचारोत्साहप्रेषितप्रतिवार्षिकद्रव्यसंस्कारसमारचित-
पुष्करपूरोचितपुण्यपुष्कराशयविस्तारसदाशिवस्वरूपसदाशिवभावनाभाविता-
तःकरणसकदणीकृतगिरीशप्रसादावलोकनस्ववंशांशावतारग्रहणानुग्रहसंतरित
दुस्तारसंसारप्रस्तारसारासारविचारसंचारचतुरशूराग्रण्यदेवब्राह्मणप्रतिपालक-
महीतलप्रख्यातमहत्त्वमालोजिमहीपाळप्रपौत्रेणप्रबळनिजामनृपछत्रपतीराज्यै
कप्रधानीभूतैकरात्रियुद्धहाहाभूतीकृतातिकोदंडकलाकलनप्रचंडतरबहळाराति-
वर्गबंदीकृतदिल्लींद्रवीरवृंदमहामाहात्म्यमूढमलिकाख्यासुरनिदेशनिध्वंससम-
यसमागतसमस्तदेवालयरक्षणक्षणतृणीकृतजीवसंरक्षणक्षात्रधुरंधरोचितपराक्र-

माचरणनिर्वार्यनिर्वंधधारणौद्धत्यनिवारिताखिलानार्यधरांतर्गतागणितगीर्वाण गणस्थापनप्रसन्नीकृतपार्वतीपतिप्रणयप्रसादैकस्थानमज्जितनिजामक्ष्मापाळ-कालाव्यवहितोत्तरकालसमायातदुष्कालप्रचुरितचक्रहाहाकारकालव्यालग्र-सितावालप्रजाजालकालतत्कालगृहीतकरालकरवालाकालकालीनकालवहलो-कांतरालोल्लसल्लसत्तडिन्मालमंडलितमंडलमंडलीकुंडलनाकुलीकृततांम्रतुरुष्क-संकालनसंकलितनिष्कलंकिकल्क्यवतारलीलोल्लासभरभरितांतःकरणपूर्वकत-द्वंश्यविशिष्टाख्यानख्यापनछत्रधारणदुर्गममहावलीदुर्गग्रहणकारणोद्भटतरर-णोत्साहोत्सेधकरणदुर्वारवैरिभटोत्कटोत्सारणस्थापितस्वामिधर्माभिमानहृतभा-ग्योद्योगविज्ञातविजातीयविक्रमाविर्भावसंभ्रमितैदिल्लदत्तैश्वर्यसमुदायदेदीप्य-मानहैंदव-धर्म जीर्णोद्धारणकरणधृतमतिसमुद्धृताद्भुतधृतिधारणानिर्धारित म्लेंछक्षयनिदानकालोचितसेतुराज्यस्वीकाराहतानेकसामंतानुसृतनरपतिप्रधा-नलीलोल्लसदतिचटुलतुरगावलीटापोल्लेखविसर्पत्क्षितिरजोछलत्क्षोदक्षोभभेरी-भांकृतिसंक्षोभगजघटाघंटारव — — गर्जनघोरानुसर्जनतर्जनत्वरितप्रयो-गप्रवीणप्रयुक्ताग्नियंत्रदुर्दिनक्रमपदातिप्रयुक्तकोलाहलक्रमकोपारुणितनेत्रसंज्ञा-संसाधितकनकगिरिप्रस्थानशौर्यौदार्यगांभीर्यधैर्याद्यगणितगुणगणग्रामाभिरा-मपूरितयाचककामकृतपरार्थव्यायामप्राप्तमहाराजनाम श्रीमनृपशाहपौत्रेण वालक्रीडनव्याजनिर्व्याजनिजनिग्रहागतजंभदंभसंरंभभरितप्रवळाफजल्लकक्ष स्थलोद्दालनविछूछालनोछलितरुधिरप्रवाहोपलिप्तदेहोद्भासितप्रकटनृसिंहस्व-पावलेपसिंहानुसारिकृताति विकृतसिंहदुर्गोछालपंचसप्ततिसहस्राश्ववारव्यूहव्यू हितसैनिकांतर्गतभावपंचास्यादिप्रचंडतरराजपुत्रानेकविधसंरक्षितदिल्लींद्राभि-माननिधानीभूतसुरत्राणमातुळमर्दनाविष्कृतजयद्रथरचितपार्थनरावतारनिक्षेप-यौवनारंभगृहीत म्लेंछक्षयदीक्षाक्षपितानेकविधविजातीयताम्रभेदोद्भावितद-क्षाध्वरध्वंसनदक्षनिग्रहानुग्रहसमर्थमहोदग्रोग्रवेषानुक्षेपदिल्लींद्रमानप्रध्वंसनपटु-करदीकृतविजयपुराधीश्वरभाग(गा)नगरेशादिछत्रपतिप्रार्थ्यमानभुजछायसह-जप्रयाणोछ्रायपलायितप्रवलःपठाणपुरसर समाक्रांतकार्नाटकप्रांतकर्णाक-र्णननितांतवलांतसमस्तसामंतचक्रशिरश्चूडामणिमंजरीपुंजपिंजरितपदपंकज-कंजिलेक्षणक्षत्रियकुलावतंसभृशवलान्वयोदधिविधुमंडलायमानमही-मंडलाखंडलछत्रपति शिवराज पुत्रेणानेकदेवप्रार्थनप्रादुर्भूतवालभावेंद्र-प्रस्थाधिनाथानुज्ञातमल्लयुद्धदत्ताज्ञाभंग संगातिरिक्तातिरक्तिमद्वचनर चनानु-रंजितचक्रवर्तिचित्तचक्रवर्तिलक्षणोपेतप्रारब्धप्रावल्यवैरिभावप्रविष्टप्रधानादि-प्रवलदुष्टमंत्र्युपदिष्टज्येष्ठपुत्रराज्याप्रदानदुर्मंत्रदुरभिप्रायाभिप्रेतनीलपीतोपाधि-

परित्यक्तस्फाटिकमणिप्रायहृत्सौजन्यैकनिकेतसापत्नरोषाक्रांतराज्ञीरागानुसारि-
पितृभावोपदिष्टशिवराजछत्रपत्याशयपरिज्ञानमात्रपितृभक्तिवैमुख्यभीरु-
धर्मपरिपाटिप्रक्रमाक्रमितदाशरथिरामविक्रमप्रक्रियप्रोत्साहपरित्यक्तपादांतसं-
क्रांततृणतुछसार्धकोटिद्रव्याद्यदुर्गबाहुल्यातिदुर्गमराज्यभारगृहीतस्वल्पाश्ववा-
रसंभारावरंगाश्वपतिसेनाधिपति संमिलनसंपादितसप्तसहस्राश्ववारवैभवसं-
भावितभूपालदुर्गग्रहणदुराग्रहग्रस्तदलेलासुरसंयोजितजानुसमासादितप्रक-
टिततृतीयनेत्रकशानुशंभुरोषाडंबरदक्षिणकराकलितसेकोशकृपाणचर्मावरस-
मासक्तवामकरवीराग्रेसरवीरकेसरिवहलवाणवर्षावलित्रस्ततांम्राग्रवर्तिषदपंचो-
छालनिगृहीतसमस्तयोधगणाक्रांतदुर्गप्रांतदेलोल्लंघितदिल्लींद्रदलपरित्यक्तधर्म-
पत्यनुषंगसंशीलितपराक्रमाकलनानुसृतदशरथाचरणशिवचरणकमलप्रहृष्टतात
प्रेमसंप्राप्तराज्यतरणिमंडलसरणिसमनुसारलोकांतरितभानुकुलभानु-संवर्धितवै-
भवभरितभूरिदुष्टसमुदायसंरंभसमारब्धदौर्जन्यपंचसप्तसेवकसाहायिकशिवयो-
गिभूतिभूषितभालप्रदेशकवीवर्यकविकलशप्रोत्साहनसमुल्लसदरुणिमसंसक्तदृ-
ग्देशगृहीतस्वेष्टदेवतानिदेशप्रचंडतरदोर्दंडास्फालननिगृहीतखलखंडखंडितारा
तिमुंडमंडलिकाप्राप्तिप्रचंडप्रनृत्तचंडीशवरवरिष्ठघोषितसर्वाभीष्टनिजाज्ञाडिंडि-
मरवोद्घोषसंतुष्टप्रजासंघद्विजदेवौघविहिताशीःपरंपरापरिपूर्णायुःसाधितसंपूर्णा-
श्वसमुदायोदंचन्मंचकाधिरोहणछत्रधारणावहेलितदिल्लीशाद्यनेकछत्रपतिध्रुव-
प्राप्तप्रकृष्टदुर्गाधिपत्यदक्षिणादृग्वीक्षणलब्धसकलदक्षिणविविधदक्षिणाप्र-
दानाभिनंदितविद्वज्जननिंदितदेवशाखिनिजप्रचंडप्रतापतपनतापिताखर्वगर्वख-
र्वीकृतारिवर्गदारुदारुणस्वयंशस्तौमशरत्सोममंडितोद्वेलडिंडीरपिंडपांडुरापार-
पारावारवेलालालितेलावलयविराजमानराजाधिराज श्री शंभुराज छत्रपति-
ना विहितं युग्मव्योमरसेंदुसंवलितसमातिक्रांतनृपशालिवाहनशकरौद्रवत्सर-
नभस्यसितदशमींदुवासरसमयराज्याबाप्त्यनेहाप्रतिज्ञातचतुर्विंशतिकृष्टलमित-
शुद्धकलधौतघटितदशसहस्रसंख्याकसुरत्राणीय वराहार्पणं प्राप्तराज्याभि-
वृध्यर्थाभिमतार्थसिध्यर्थगुरुपादुकापूजनपुरःसरं श्रीपादुकापूजननिमित्तं
सकलविपक्षक्षयार्थमायुरारोग्यैश्वर्यपुत्रपौत्राद्यभिवृध्यर्थं प्रत्यब्दं स्वीयस्वामीय
पुत्रपौत्रपारंपर्यक्रमेण चालनीयं उपभोक्तव्यं च सुंदरीमंदिरमंडनार्थानुदत्त-
सहजनिजकरोर्ध्वकरणपुष्कराकुंचनोपहसितैरावतमहत्त्वमत्तमातंगवल्गुवल्गन-
विजितरविरथतुरंगमालिवाजिरत्नाग्रगण्योच्चैःश्रवससमानजातीयपंचाश्वसां-
गोपांग याप्ययानप्रतिवर्षसंबंधिभक्ष्यभोज्यसहितसपरिजनसपरिवारस्वामि-
वार्षिकमप्येतदंतर्गतमेव बोद्धव्यं इत्यलं विस्तरपत्ररचनया शुभमस्तु ॥
दानपाळनयोर्मध्ये दानाछ्रेयोनुपालनं दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पदं

॥१॥ शिष्टाय द्विजवर्याय यो ददति धनं धरां ॥ कल्पकोटिशतं यावच्छिवलोके महीयते ॥ २ ॥ मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेतमनसो भुवि भावि भूपाः ॥ ये पालयंति मम धर्ममिमं समग्रं तेभ्यो मया विरचितोँ जलिरेष मूर्ध्नि ॥ ३ ॥ सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां काळे काळे पाळनीयो भवद्भिः ॥ इत्थं सर्वान्भाविनः पार्थिवेंद्रान् भूयो भूयो याचते रामचंद्रः ॥ ४ ॥ एतत्पालयते यस्तु पूतात्मा धौतकिल्बिषः ॥ भुक्तिमुक्तिफळं प्राप्य मोदते कुलजैः सह ॥ ५ ॥ शके राज्याभिषेकस्य सप्तमे रौद्रवत्सरे ॥ भाद्रे सितेनंगमृगौ चंद्ररुद्रे च संगवे ॥ ६ ॥ नारायणाध्वरींद्रस्य रघुनाथाभिधः सुतः ॥ आमात्यो दानपत्रेस्मिन्लेखनालंकृतिं व्यधात् ॥७॥ लेखनालंकार

संमत आबाजी

चंद्र ११ मास भाद्रपदं — सोनदेऊ सचीवं

मास भाद्रपद ऊर्फ सावान

सन इहिदे समानीन अलफ

वार सुद वार शुध वार[3]

अनुमतं च दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितरायस्य शुभमस्तु छ.[4]

[5]लक्ष्मीनृसिंहभक्तश्रीनीरेरायाब्धिसन्मणेः ॥ प्रल्हादवर्धिनी मुद्रा प्रल्हादस्य विजृंभते मर्या देयं विज यते[6]

(टीपा : १. 'मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य' इत्यादि श्लोकातील अक्षरे संभाजीच्या हातची आहेत असे दिसते.

२. मुळात 'तकटा' आहे ते 'तटाक' असे वाचावयाचे.

३. श्लोक ७ नंतर 'लेखनालंकार' पासून शेवटचा 'शुध वार' येथपर्यंतचा मजकूर मोडी लिपीत आहे.

४. 'अनुमतं' इत्यादि मजकूर देवनागरीत आहे.

५. ही मुद्रा प्रारंभी व मजकुराच्या डाव्या बाजूस आहे.

६. 'मर्यादा' शिक्का प्रत्येक जोडावर पाचदा उठविला असून पाच जोडांचा हा सबंध कागद आहे.)

■ ✠ ■

संभाजीराजांच्या दानपत्राचे मराठी भाषांतर

संदर्भ :

ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा, प्रकरण तिसरे (पृ. १२-१८)

संभाजीराजांच्या दानपत्राचे भाषांतर

श्री

डोक्यावरील जटांना स्पर्श केल्यामुळे सुंदर दिसणाऱ्या, त्रैलोक्यनगरीच्या मूलस्तंभस्थानी असलेल्या शंकराला नमस्कार असो.

ब्रह्ममध्ये ज्याचा आनंद आहे, परमसुखद, कैवल्याची मूर्ती, सुख-दुःखादी द्वंद्वांच्या पलीकडे असणाऱ्या, आकाशासमान (व्यापक), तत्वमसि इत्यादी उपनिषदांतील वाक्यांनी बोध होणाऱ्या, एकमेव, नित्य, विशुद्ध, स्थिर, सर्वज्ञानाला साक्षीभूत असलेल्या, संकल्प-विकल्पांच्या पलीकडील, सत्त्व, रज, तम या त्रिगुणांच्या विरहित असलेल्या सद्‌गुरूला मी नमस्कार करतो.

यापुढे मी जे लिहिले आहे ते शिवाजीचा राजपुत्र असलेल्या छत्रपती संभाजीला - मला संमत आहे.

॥ श्री॥ स्वस्ति॥ रत्नखचित बहुमूल्य माणकांनी मंडित, प्रमुख सुवर्ण स्तंभानें शोभित, सोन्याच्या तारेत गुंफलेल्या सोन्याच्या मण्यांच्या आणि हिऱ्यांच्या तेजाने प्रकाशित, सोन्याच्या आणि चांदीच्या तारांनी विणलेल्या वस्त्राने अलंकृत, पाचूच्या माळांनी मढविलेले, जमलेल्या देवगणांच्या समोर संगीतकलेचा आविष्कार करणारे गंधर्व, सिद्ध, किन्नर, साध्य, अप्सरा यांच्या कंठातील माधुर्याने, नटलेल्या गायनाने संतुष्ट झालेले, अतिशय मनोहर आणि चकाकणाऱ्या सोन्याने मढविलेल्या नाना प्रकारच्या नौकांनी सुशोभित, सुवर्णालंकारांनी सुशोभित राजमंडळाला शोभणारे, अमृताच्या समुद्रात विराजमान, त्रैलोक्याचा सम्राट, कविकुळाच्या मधुर वाणीने स्तुती केला जाणारा, प्रधान मंडळातील केंद्रीभूत, ज्याच्या राज्यात रोज उमलणारे बकुळ, कोरांटीचे कुंपण असलेले, चंपक, अशोक, कुडा, कल्हार, नाग, पुनाग, मल्लिका, मालती, केतकी, जाई आणि वेलदोड्याच्या झाडांनी वेढलेले, ताल, तमिळ, हिंताल, नारळ, सुपारी, डाळिंब, जांभूळ, लिंबू, जंबीर आणि संत्र्याच्या झाडांनी वेष्टित, पारिजात वृक्षांनी सुशोभित, लवलीच्या वेलांनी संप, माधवी लतांमुळे मनोहर, मोहोर आलेल्या आम्रवृक्षांच्या मंजरीच्या आस्वाद घेणाऱ्या मत्त कोकिळांच्या मधुर आवाजाने ज्याचे हृदय स्तंभित होते, मानिनींची मानखंडना करणारा सर्व दुर्वासनांचे बीज ज्याने निरस्त केले आहे, अधरिखात्मक बीजाचा आधारभूत, वाणी आणि मन यांच्या पलीकडील, नाना प्रकारच्या फुलांमध्ये आणि मधुर आणि द्राक्षमंडपाशी संबंधित फुलांचा मध चाखणाऱ्या भुंग्यांच्या गुंजारवाने झंकारणाऱ्या आपल्या राज्यातील चंदनाच्या झाडांमुळे ज्याने नंदनवन आणि कुबेराचे उद्यानही मागे टाकली आहेत, भक्तजनांचा प्राण, शुक, सारिका, आणि सारस यांनी आपल्या आवाजाने जेथे सर्व दिशा भरून टाकल्या आहेत, महापातकांच्या समूहाला जेथे आश्वासन आणि समाधान ही दिली जात आहेत. महोद्यानांच्या मालिकेप्रमाणे मनोरम असलेल्या पृथ्वीतील विशिष्ट द्वीपाशी संबंधित

TG : MarathaArchives

समुद्रातून निघालेल्या रत्नांनी उजळलेल्या दिशांनी व्याप्त, देवतागणांनी व्यापलेल्या, गोपुरांमुळे ज्यांच्या संसार-परिभ्रमणाच्या वेदना शमल्या आहेत अशा साधकांना ज्याने आश्रय दिला आहे, ज्याचा अंतरात्मा शांत झाला आहे, ज्याच्या राज्यातील भक्तजनांनी कृतांतालाही नमविले आहे. मौल्यवान मोत्यांच्या माळांनी गुंफलेल्या मृदु आस्तरणांनी ज्याच्या राज्यातील देवालये सजली आहेत, नाना प्रकारच्या गच्च्या आणि ओटे यांनी ज्याचे निवासस्थान सजले आहे. प्रचुर अगरु, गुग्गुळादी, अष्टांग धूपांनी घमघमाट केलेले सुवर्णाचे प्रकार ज्याच्या निवासस्थानात आहेत, सहृदयतेने ज्याचा संसार चालू आहे, अनेक विद्वान ज्याच्यापुढे हात जोडत आहेत, ज्याच्या निवासस्थानाच्या कक्षात नेमलेला स्त्री परिजन केवळ संकेतांद्वारे ताब्यात ठेवला आहे, विष्णू, ब्रह्मदेव आदि प्रमुख देवाधिदेवतांच्या अस्तित्वामुळे ज्याच्या निवासाला सार्वभौमत्व आले आहे, सुंदर रत्नखचित मंदिराच्या अंतर्भागात पेरलेल्या युवांकुरांमुळे शोभणारे, पाच मंचकांवर आरुढ झालेल्या ब्रह्मादी देवतांनी ज्याचा आश्रय केला आहे, अत्तरांमुळे सुगंधित झालेल्या विपुल पलंगपोसांनी आच्छादलेली आसने जेथे आहेत, कमनीय कामेश्वराच्या मांडीवर बसलेली हसतमुख मूर्ती, किंचित उमललेल्या तांबड्या कमळाच्या सौंदर्याला ज्याने मागे टाकले आहे, निसर्गतःच काजळ घातल्यासारखे ज्याच्या नेत्रांचे लावण्य आहे, नीलकमलाच्या सौंदर्यालाही ज्याने मागे टाकले आहे, पिकलेल्या डाळिंबाच्या दाण्याच्या रंगवैभवाला ज्याने परास्त केले आहे. दंतपंक्तीचे किरण आणि शरीराच्या वरच्या भागात धारण केलेल्या गुलाबी वस्त्राने ज्याने रक्तवर्णाची उधळण केली आहे, ज्याच्या पिळदार शरीराचा गुलाबी रंग शोभत आहे, माणकांच्या माळांच्या आड ज्याच्या गळ्यातील मोती, हिरे आणि इंद्रनील मण्यांचे हार दडलेले असूनही तेज प्रगट करीत आहेत. गंगेने आपल्या प्रवाहात सामील करुन घेतलेल्या यमुना जलाच्या लाटांप्रमाणे प्रकाशमान, रूपवती सरस्वती ज्याच्या सेवेला हजर आहे, शंकराच्या मुखावर विराजमान असलेल्या चंद्राच्या किरणांचे अमृतपान ज्याने केले आहे, अमृतबिंदूंप्रमाणे असलेल्या नासामौक्तिकाच्या प्रातःकालीन संध्येप्रमाणे भासणाऱ्या छटेने प्रकाशित, ढगांच्या जाळ्यातून बाहेर आलेल्या अरुणोदयकालीन सूर्यमंडलाप्रमाणे लाल वस्त्राने आच्छादित, माणकाच्या रंगाचे शिरोभूषण धारण केलेला, तारुण्यकाळात केलेल्या राजराजेश्वराच्या उत्कट तपश्चर्येचे फळ म्हणून प्राप्त झालेले अनुपम उन्नत स्तन, संकोचाने मध्यभागी वाकल्यामुळे होणाऱ्या त्रिवलीमुळे व्यक्त होणाऱ्या शृंगाराच्या बीजांकुराची कळीप्रमाणे असलेली, शरीरावर व्यक्त होणाऱ्या क्षेमराजीमुळे शोभणाऱ्या राजराजेश्वरीच्या निरंतर सान्निध्यसुखाची आस धरणारा, हंसासारखी वेशभूषा असणारा, सर्वांतर्यामी वास करणाऱ्या परमहंस परमेश्वराच्या चरणाची सेवा करणारा, घंटानादाच्या द्वारे ज्याच्याकडे चारी वेदांची सेवा होत आहे, शरीराच्या निरनिराळ्या सशब्द आणि निःशब्द व्यापारांच्याद्वारे सृष्टीला आधारभूत असलेल्या परमात्म्याचे ध्यान करणारा,

शत्रूकडून होणाऱ्या हानीचे निवारण करणारा, दहा प्रकारची व्यवस्था असलेल्या दिव्य देहात वास करणारा, ज्याने (वाघ)नखे धारण केली आहेत, ज्याला चंद्राचा वियोग सहन होत नाही. ज्याच्या हाताच्या बोटांत हिरव्या, लाल, पिवळ्या, श्यामल वर्णाच्या रत्नांच्या अंगठ्या आहेत, कपटकारस्थान करणाऱ्या क्षत्रियांचे देहभान वापरल्यामुळे त्यांच्या अनुभवाला येणाऱ्या अलंकृत रसाप्रमाणे (लाल रक्ताच्या सड्याने) त्यांचे पारिपत्य करणारा, प्रेमाचा वर्षाव करुन आपली भावना व्यक्त करण्याचे व्रत घेतलेले, अनेकांशी एकाच वेळी केलेले युद्ध, द्वंद्वयुद्ध, लपंडावाचे युद्ध इत्यादी प्रकारांचा आश्रय करणारे लाडीक कोपाच्या द्वारे अपेक्षित फल देण्याचे कसब ज्याला माहीत आहे, अहमहमिकापूर्वक अभूतपूर्व पंचपल्लवांनी युक्त कल्पवृक्षांच्या शिखेची स्पर्धा करणाऱ्या देवतेच्या चरणकमलांचा ध्यास घेऊन तिच्याशी तादात्म्य पावून प्रत्यही तिची भक्ती करण्याची ज्याची प्रवृत्ती आहे, पादुका-पूजनामुळे प्राप्त झालेल्या हुंकारामुळे ज्याने नहुषाचा प्रभाव घालविला आहे, मोठ्या लाटांनी ज्याच्या राज्यात समुद्राचे पाणी उफाळत आहे, पाहाताक्षणी हृदयात प्रवेश करणारा, तातापि आणि वातापी यांनी लावलेल्या वणव्यामुळे विंध्याद्रीवर ओढवलेल्या आपत्तीमुळे क्रुद्ध झालेल्या लोपामुद्रापती अगस्त्यऋषींचा प्रभाव आणि त्यांचे योगसामर्थ्य ज्याला ज्ञात झाले आहे, भस्माची चर्या, ध्यान, स्तोत्रपठण, रुद्राक्षधारण आणि डोक्यावर धारण केलेला केशभार यांच्या योगे ज्याने अर्धनारीनटेश्वराचे रूप धारण केले आहे, केवळ विभूती प्रदान करण्याने ज्याने परमसामर्थ्य प्रदान केले आहे, प्रसिद्ध शुद्ध सहज भावामध्ये जो प्रत्यही मग्न आहे, पद्मासन आणि कामकलास्तोत्र पठण यात जो रोज सहा प्रहर खर्च करीत आहे,

अशा शंभूराजाने केलेल्या प्रार्थनेला अनुसरून जिच्या भुवया वक्र झाल्या आहेत, जी सर्वत्र संचार करीत आहे, जिच्या नेत्रातील लालीमुळे (शत्रू) भयभीत झाले आहेत, अशांना अवलोकून जिच्या भुवया वक्र झाल्या आहेत, काही मग्रूर, महाराष्ट्रवासी, ढगांमध्ये चमकणाऱ्या विजेप्रमाणे चंचल, ऐश्वर्यामुळे मदांध झालेले प्रमादशील, मदिरोन्मत्त, दुष्ट मंत्र्यांचा सल्ला मानणारे, (शंभूराजाच्या) छत्रधारणाला आणि सिंहासनावर बसण्याला अडथळा आणणारे, प्रचंड कोलाहल करणारे, भयंकर संग्रामाला प्रवृत्त झालेले, गावात दहशत माजविलेले, समुद्रवलयांकित पृथ्वीतलावर प्रसिद्ध असलेले, गुरुपरिचर्या केल्यामुळे ज्यांचे अंत:करण शुद्ध झाले आहे, सर्व लोकांचा आधार, सगळे लोक ज्यांची स्तुती करतात. महापातकांचा क्षय करणे, ईश्वराचे स्मरण करून संसार तापत्रयाचे निवारण करणे, नित्यपूजन करणे, भक्तांना आधार देणे, भावभक्तीमुळे ज्याने चैतन्यावरील आवरण दूर केले आहे, दुर्दैवाच्या वणव्याने पिडलेल्यांच्या पापांचा प्रतिकार करणे, प्रमोदाचे पांघरूण भक्तांवर घालणारे, एकनिष्ठ ध्यानामुळे शुद्ध झालेले जन्म, जरा, मरण, संसार सागर पार करणे यांसाठी उपाय सांगणारे, वेध, स्मृति, शास्त्र, पुराण यांनी

सांगितलेल्या मार्गाने जाऊन संसार तरून गेलेले, महाप्रलयकालाचे निवारण करण्याचे ज्ञात असलेले योगी स्वनामधन्य जामगोत्री, कुडाळ नगरातील सर्वश्रेष्ठ उपाध्याय, ब्राह्मणवर्गात श्रेष्ठ नामदेवभट्टांचे चिरंजीव, आश्वलायनसूत्री, ऋग्वेदसकलशाखाध्यायी, सर्व मंत्रिकांत श्रेष्ठ, सर्वांच्या आदराला पात्र, यमनियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार ध्यानधारणा समाधी, या अष्टांगयोगाच्या अनुष्ठानाने ज्यांनी वसिष्ठादि मुनींवर वरचढ केली आहे अशा महाशय स्वामीला, शिखर शिंगणापूर महादेवाच्या यात्राप्रसंगी आलेल्या सर्व दिशांत वास्तव्य करणाऱ्या जनतेचे पाण्यावाचून होणाऱ्या हालअपेष्टांचे वर्णन ऐकून शिवभक्तीने प्रेरित होऊन स्वतःच्या खर्चाने तलाव बांधण्याचा संकल्प हरिश्चंद्र, रंतिदेव, या पूर्वजांनुसार केला, मांधातासारख्या उदार राजाचे अनुकरण करण्याचे ठरवून कामाला आरंभ करण्याचा निश्चय करून आपल्या कुळातील एकशेएक पूर्वजांचा उद्धार करण्याच्या निश्चयाची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने (शंकराने) कैलासवास सोडून भूलोकावर आगमन केले. पूर्वीच्या सेवेतील उद्योगाला मिळालेल्या अनुभवांचा ज्याने उपयोग केला आहे. निजामाच्या दरबाराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली आणि दृढ संबंध ठेवून आवश्यक ते राजकारण करणारा जुन्या घडामोडींचे अनुसंधान ठेवून आपल्या कामामध्ये व्यग्र असलेला, वेद, शास्त्र, पुराण, स्मृति, आगम, अनुमिति सिद्धान्त यातील सिद्धांतानुसार निर्माण झालेल्या पृथ्वीवर इंद्राप्रमाणे राज्य करणारे, प्राप्त झालेले विपुल वैभव, घोड्यांच्या खिंकाळण्याने उत्साहित, मेघगर्जनेमुळे दारिद्र्य ज्यानी घालविले आहे, घोडे आणि हत्ती यांची सेना ज्याच्याजवळ आहे, सिंहाप्रमाणे जो चहूबाजूंना नजर ठेवीत आहे, मनात आलेले विचार आणि त्याप्रमाणे आचार करण्याच्या उत्साहाने परिपूर्ण, प्रतिवर्षी द्रव्य खर्च करून ज्याने तलाव बांधले आहेत आणि त्यायोगे पुण्यसंकलन केले आहे, जो सदाशिवस्वरूप आहे, शंकरासंबंधीच्या पूज्य भावनेने ज्याचे अंतःकरण भरून गेलेले आहे, करुणामय शंकराने कृपा करून ज्याच्या वंशात अंशावतार धारण केला आहे, ज्याच्या अनुग्रहाने संसार तरून गेला आहे, सारासार विचार करणारा, चतुरशूराग्रणी, देवब्राह्मणप्रतिपालक, पृथ्वीतलावर ज्याचे मोठेपण प्रसिद्ध आहे, अशा मालोजीराजाचा पणतु, प्रबळ निजामशहाच्या राज्याचा मुख्य प्रधान, केवळ एक रात्र युद्ध करून ज्याने सर्वत्र हाहाकार माजविला आहे, धनुर्धारी ज्याने शत्रुसैन्याला कैद केले आहे, दिल्लीच्या बादशहाच्या प्रचंड सैन्यामुळे जो चकीत झाला आहे. मलिखानाच्या आज्ञेने सर्वत्र विध्वंस होत असता धावून आलेला, सर्व देवालयांचे रक्षण करण्याच्या प्रसंगी ज्याने आपला जीव तृणासमान क्षुद्र मानला, क्षात्रधुरंधर, ज्याने शर्थीने पराक्रम केला, शत्रूच्या अडवणुकीला शर्थीने तोंड देवून, ज्याने सर्व म्लेच्छांना धराशायी केले, अगणित देवालयांची स्थापना करून ज्याने शंकराला प्रसन्न करून घेतले आणि त्याचा प्रसाद संपादन केला, निजामशाही अंमल सुरू झाल्याच्या पाठोपाठ आलेल्या दुष्काळामुळे प्रजा व्याकुळ झाली असता तत्काळ

ज्याने उपाययोजना केली, चमकत्या विजेप्रमाणे (तलवार चालवून) ज्याने ताम्र आणि तुर्क यांना जर्जर करून सोडले, कलंकी अवताराप्रमाणे पराक्रम करून ज्याने आत्मीयतेने स्ववंशीयांना उच्च स्थानी बसविले, छत्र धारण केले, माहुलीगडाला वेढा पडला असता प्रचंड उत्साहाने शत्रुसैन्य घालवून स्वामिधर्माचे पालन केले, बाका प्रसंग ओळखून ज्याने योग्य पावले टाकून पराक्रम केला, गोंधळलेल्या आदिलशहाने दिलेल्या ऐश्वर्यामुळे जो शोभू लागला. हिंदुधर्माचा जीर्णोद्धार ज्याने केला, ज्याच्या धाडसाने केलेला पराक्रम जो म्लेच्छांच्या विनाशाला कारणीभूत झाला, कालाला अनुसरून ज्याने मर्यादित राज्य स्वीकारले, गौरविलेले अनेक सामंत ज्याच्या छत्राखाली आहेत अशा राजाचा प्रधान, अतिचपळ घोड्यांच्या टापांमुळे उडणारी धूळ, दळणाच्या जात्यांचा आवाज, नगारे आणि चौघडे यांचा आवाज, हत्तीच्या पाठीवर बांधलेल्या घंटांचा नाद, (सैनिकांची) गर्जना, वीरांचे प्रोत्साहन, धमकावणे, जाणकार सैनिकाने उडविलेले तोफांच्या गोळ्यांचे आवाज, पायदळाचा आरडाओरडा, क्रोधाने लाल झालेले डोळे, इत्यादी प्रकारांसह कनकगिरीवर केलेल्या चालीमध्ये व्यक्त झालेले शहाजीराजे यांच्या नातवाने केलेल्या बालक्रीडा पाहून संतुष्ट झालेले (शिवराय) आवेशाने भारलेले, ज्याने प्रबळ अफजलखानाला खास उभारलेल्या मंडपात कुचलले, विचवा चालवला, त्याच्या अंगातून उसळलेल्या रक्ताने ज्यांचा देह माखला गेला, नृसिह प्रगट झाल्यासारखे जे भासले, सिंहाप्रमाणे पराक्रमी, अतिशय अवघड, अशा सिंहागडावर चाल करून जाण्यासाठी पंच्याहत्तर हजार घोडदळ उभारले आणि सैन्याची गृहरचना केली. पराक्रमी राजपुत्रांचे संरक्षण असलेल्या दिल्लीच्या बादशहाचे अभिमानस्थान असलेल्या सुलतानाच्या मामाचे ज्यांनी मर्दन केले जसे जयद्रथाचे पार्थाने केले, ताम्रमुखी सैनिक ज्याने जमा केले, दक्षयज्ञाचा विध्वंस करण्याचा ज्याने निश्चय केला, निग्रह आणि अनुग्रह करण्याला समर्थ प्रचंड आणि उग्र चेहऱ्याच्या शत्रूंचे पारिपत्य करणारा, दिल्लीच्या बादशहाची मानखंडना करण्याला टपलेला, विजापुरचा बादशहा आणि भागानगरचा निजाम हे ज्या छत्रपतींच्या पराक्रमाचा आश्रय घेऊ इच्छितात. आपल्या सहज हालचालींनी ज्याने प्रबळ पठाणांना पळवून लावले, कर्नाटकप्रांतांवर आक्रमण केले, आणि तेथील प्रशासकांना जेरीस आणले, समस्त सामंतचक्राच्या शिरोभागी विराजमान, आंब्याच्या मोहराप्रमाणे ज्याचे पाय पिवळे झाले आहेत आणि काजळ घातल्यामुळे ज्याचे डोळे सुंदर दिसत आहेत, क्षत्रियकुलावतांस भोसले कुळसागरात चंद्राप्रमाणे शोभायमान, पृथ्वीलोकांतील जणू काही इंद्र अशा छत्रपती शिवरायांच्या पुत्राने, अनेक देवतांची प्रार्थना केल्यामुळे ज्याला कालमान - प्राप्त झाला आहे, इंद्रप्रस्थाच्या अधिपतीने ज्याला अनुज्ञा दिली आहे, मल्लयुद्धासाठी दिलेल्या आज्ञेचा ज्याने भंग केला आहे, ज्याचा स्नेह दृढ आहे , ज्याचे बोलणे मधुर आहे, चक्रवर्ती राजाप्रमाणे ज्याची मनोवृत्ती आहे, चक्रवर्ती लक्षणांनी युक्त, दुर्दैववशात् वैरभाव पत्करलेल्या प्रधानआदिकरून प्रबल दुष्ट मंत्र्यांच्या सांगण्यावरून

ज्येष्ठ पुत्राला राज्य न देण्याचा दुष्ट सल्ला मानला गेल्यामुळे ज्याला नानाविध उपसर्ग झाले आहेत, स्फटिकमण्याप्रमाणे ज्याचे हृदय आहे, सौजन्याची मूर्ती, सापत्नभावाने झपाटलेल्या राण्यांच्या क्रोधाला अनुसरून पित्याच्या कर्तव्याला न जागणाऱ्या छत्रपति शिवराजांचा विचार कळल्यामुळे पितृभक्तीपासून दूर गेलेले, धर्मपरंपरेने चालणाऱ्या दाशरथी रामाप्रमाणे पराक्रमी, धार्मिक विधीसंबंधीच्या निष्ठेमुळे ज्याने आपादमस्तक साधेपणा स्वीकारला आहे, सहजगत्या दीड कोटी नाणी खर्च करून बांधलेल्या अनेक किल्ल्यांमुळे अवघड वाटणारा राज्यभार ज्याने आपादमस्तक साधेपणाने स्वीकारला आहे, घोड्यांची छोटी पागा उभारली आहे, औरंगजेबाच्या सप्तहजारी सेनापतीने (सात हजार घोडदळाच्या प्रमुखाने) भूपाळगड काबीज करण्यासाठी योजना आखून संभाजी राजांपुढे गुडघे टेकले. (नतमस्तक झाला.) त्यावेळी शंकराच्या तिसऱ्या डोळ्यातून अग्नी प्रकट व्हावा त्याप्रमाणे ते क्रोधायमान झाले. नंगी तलवार आणि डाव्या हातात ढाल ज्याने घेतली आहे, वीराग्रेसर, वीरकेसरी बाणांचा वर्षाव करून ज्याने ताम्रांना भयभीत केले आहे, ज्याचे आघाडीचे वीर शत्रूवर अचानक छापा घालून त्यांना पकडतात, समस्त योद्ध्यांनी काबीज केलेले किल्ले आणि सभोवतीचे प्रदेश यांच्यावर जो सहजगत्या आक्रमण करतो, दिल्लीच्या बादशहाने पाठविलेल्या मौलवींच्या प्रचाराला तोंड देण्यासाठी ज्याने पराक्रमाची शर्थ केली आहे, दशरथराजाच्या पराक्रमाचे ज्याने अनुसरण केले आहे, शिवचरणी वाहिलेल्या कमलामुळे हर्षित झालेला वडिलांच्या प्रेमामुळे ज्याला राज्य प्राप्त झाले आहे, सूर्यमंडलाच्या संचारप्रदेशावरून आक्रमण करणाऱ्या सूर्याप्रमाणे जो (भोसले) कुलाचा सूर्य आहे, वैभवाने नटलेला, दुष्टांच्या टोळीने उडविलेल्या दंडेलीचे पारिपत्य ज्याने पाच-सात सेवकांच्या साहाय्याने केले आहे, शिवयोगाप्रमाणे ज्याने कपाळावर भस्म चर्चिले आहे, कविवर्य कवि कलशाच्या प्रोत्साहनामुळे ज्याच्या डोळ्याना लाली आली आहे. आपल्या इष्ट देवतेचा आदेश ज्याने स्विकारला आहे. आपले प्रचंड दंड ज्याने थोपटले आहेत, दुष्टांच्या समूहाला ज्याने जखडून ठेवले आहे, शत्रूंची डोकी ज्याने उडविली आहेत, मांडलिक सरदार मिळाल्यामुळे जो बलवान झाला आहे, नृत्य करणारी चंडी आणि शबरी आदि वरिष्ठ देवतांनी ज्याचे अभीष्ट चिंतिले आहे, ज्याच्या आज्ञेचा डंका सर्वत्र वाजत आहे, ज्याच्या राज्यातील प्रजा संतुष्ट आहे, द्विज आणि देवता यांनी दिलेल्या आशीर्वादामुळे ज्याला पूर्ण आयुष्य लाभलेले आहे, घोडदळाच्या उपस्थितीत ज्याने उंच मंचकावर बसून छत्र धारण केले आहे, दिल्लीच्या बादशहासहित अनेक राजांना ज्याने तुच्छ लेखले आहे, ज्याला मजबूत किल्ल्यांचे आधिपत्य मिळाले आहे. उजव्या डोळ्याने पाहिल्यामुळे सगळा दक्षिण देश ज्याच्या ताब्यात आला आहे, नाना प्रकारच्या दक्षिणा देऊन ज्याने विद्वानांचा सत्कार केला आहे, देवगणांची निंदा ज्याने केली, अशांना ज्याने

आपल्या प्रचंड पराक्रमरूपी तेजाने भाजून काढले आहे, प्रचंड अभिनिवेशाने ज्याने शत्रूंना नेस्तनाबूत केले आहे, काष्ठाप्रमाणे निष्ठुर स्वयंप्रकाशित शरदऋतूतील चंद्राप्रमाणे शोभायमान समुद्रतीराबाहेर पडलेल्या समुद्रफेसाप्रमाणे शुभ्र वर्ण, अनंत पृथ्वीतलावर विराजमान असलेले राजाधिराज श्रीशंभुराज छत्रपतींनी केलेले शालिवाहन शके १६०२ रौद्र संवत्सरात भाद्रपद शु. १० सोमवार या दिवशी राज्यप्राप्तीच्या शर्तीवर कबूल केलेले प्रत्येकी २४ गुंजांच्या शुद्ध चांदीच्या दहा हजार नाण्यांचे दान, मिळालेल्या राज्याच्या वृद्धीसाठी अभिमत अर्थसिद्धीसाठी गुरूपादुकापूजनपुर:स्सर श्रीपादुकांच्या पूजनानिमित्त सर्व शत्रूंच्या संहारार्थ आयुरारोग्य ऐश्वर्यपुत्रपौत्रादींच्या अभिवृद्धीसाठी प्रतिवर्षी स्वत:च्या व स्वामींच्या पुत्रपौत्रादी परंपरेने चालवावे आणि त्याचा उपभोग टाळावा. सुंदरी मंदिराच्या शोभेसाठी आणि मदतीसाठी पुढे केलेल्या हाताने मंदिर-रचना, जलाशय खोदणे, ऐरावताला मागे टाकतील अशा मत्त हत्तींच्या आकर्षक क्रीडांनी ज्यांनी सूर्याच्या रथाच्या घोड्यांना जिंकले आहे. घोड्यांमध्ये सर्वश्रेष्ठ अशा उच्चै:श्रवा या इंद्राच्या अश्वाच्या समानजातीय पाच घोडे जोडून चालविलेले वाहन प्रतिवर्षी लक्ष भोज्यासह परिजन आणि परिवारासह स्वामींच्या वार्षिक उत्सवासाठी दान यातच अंतर्भूत समजावे. अधिक विस्ताराची आवश्यकता नाही. शुभमस्तु !

दान आणि पालन यांमध्ये दानापेक्षा पालन हे अधिक श्रेष्ठ आहे. दानापासून (ते देणाऱ्याला) स्वर्ग प्राप्त होतो. मात्र पालनापासून अच्युतपद प्राप्त होते. सदाचारी श्रेष्ठ ब्राह्मणाला जो धन आणि भूमी दान देतो तो कोटी: कल्पांतापर्यंत शिवलोकांत सन्मान पावतो. माझे वंशज अथवा अन्य राजांचे वंशज, पापभिरु असे या पृथ्वीवर भविष्यकाळी होणारे राजे जे या माझ्या समग्रधर्माचे पालन करतील, त्यांच्यासाठी मी माझ्या शिरावर अंजली धारण करतो. राजेलोकांचा हा सामान्य धर्मसेतु याचा सदासर्वकाळी आपण आदर करावा. अशी हा रामचंद्र सर्व भावी राजेलोकांना प्रार्थना करीत आहे. जो शुद्धात्मा आणि निष्पाप पुरुष या धर्माचे पालन करतो त्याला भुक्ती आणि मुक्ती असे उभयविध फळ मिळते आणि तो वंशजांसह आनंदात राहातो.

राज्याभिषेकाच्या सातव्या वर्षी रौद्र संवत्सरात भाद्रपदमासी शुद्ध पक्षात चांद्र एकादशीच्या दिवशी सकाळच्या प्रहरी रघुनाथ नारायण अमात्य यांनी या दानपत्रावर लेखनालंकार केला.

(भाषांतर - श्री. चिं. ग. काशीकरशास्त्री, पुणे यांच्या सौजन्याने)